# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५७** **दिनांक १२/०६/२०२१**

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने अपहृत अल्पवयीन मुलीचा शोध घेवुन आरोपीस केली अटक.

दि.०१.०६.२०२१ रोजी फिर्यादी यांनी तक्रार दिली की, त्यांची अल्पवयीन मुलगी वय-१४ वर्षे हीस कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेले आहे, बाबत दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ४१५/२०२१ भादविसं.क. ३६३ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी समांतर तपास करुन गुन्हयातील अपहृत अल्पवयीन मुलगी हिचा काशिमीरा परिसरामध्ये शोध घेवुन तिचे आई-वडील आणि इतर नातेवाईकांना भेटुन अपहृत मुलीबाबत विचारपुस करुन अधिक माहिती घेवुन गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला. सदर अपहृत मुलगी हि नालासोपारा पुर्व या परिसरामध्ये दोन इसमांचे संपर्कात असल्याची माहिती मिळाल्याने त्याअनुषंगाने पोलीस पथकाने नालासोपारा परिसरामध्ये अपहृत मुलीचा शोध घेतला व तिच्या संपर्कातील दोन इसम व नातेवाईक यांना विश्वासात घेवुन अपहृत मुलीचे संभाव्य वास्तव्याबाबत अधिक माहिती मिळवुन तसेच फिर्यादीच्या संपर्कात राहुन अपहृत मुलगी हिला मिरारोड पुर्व, २२ नंबर काशिमिरा परिसरातून ताब्यात घेतले. तद्नंतर सदर अल्पवयीन मुलीस महिला पोलीस अंमलदार मपोना/२८४५ चव्हाण याचे वतीने प्राथमिक विचारपुस केली असता अपहृत मुलीचे सावत्र वडिल हे तिला शारिरीक व मानसिक त्रास देत असल्याने ती घर सोडुन गेल्याचे सांगितल्याने अपहृत मुलीचे सावत्र वडिलास ताब्यात घेवुन अपहृत मुलगी व सावत्र वडिल यांना पुढील कार्यवाही करीता काशिमिरा पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले असून सदर आरोपी विरुध्द भादंविस कलम ३७६ (एन), ३७७ सह पोक्सो कायदा २०१२ चे कलम ४,८,१२ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, व.पो.नि., अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे, पो.हवा./१६३ रामा पाटील, पोशि/३६६० केशव शिंदे, मपोना/२८४५ चव्हाण, चा.पोना/२६३८ सम्राट गावडे नेम. अ.मा.वा.प्रति.कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

-----oooo------